# प्रेस नोट

---

## विकल्प - स्किल व्हाउचर प्रकल्पाची पुण्यामध्ये सुरुवात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत "विकल्प" या नावाने एका अभिनव स्किल व्हाउचर प्रकल्पाची पुण्यामध्ये सुरुवात करित आहे. पुण्यातील अनुसूचित जातीच्या युवक-युवतींना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देऊ शकणाऱ्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमधून आपल्या आवडीनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम निवडता यावा, हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट्य आहे.

या प्रकल्पामध्ये सहभागी होणार्या  अनुसूचित जातीच्या युवक-युवतींना "स्किल व्हाऊचर्स" देण्यात येणार आहेत. या "स्किल व्हाऊचर" चा उपयोग करून अनुसूचित जातीच्या युवक-युवती  हे बार्टी, पुणे यांनी नेमणूक केलेल्या प्रशिक्षण संस्थांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण घेऊ शकतील. या व्हाऊचर्सचा वापर पुण्यातील निवडक पाच नामांकित प्रशिक्षण संस्थांमध्ये माहिती तंत्रज्ञान, मॅन्युफॅक्चरिंग आणि बँकिग व आर्थिक सेवा क्षेत्रातील अकरा विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याकरिता करता येईल. या प्रकल्पाकरिता गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देण्याची व उत्तम नोकरीच्या संधी उपलब्ध करून  देण्याची क्षमता आणि अनुभव असल्याची खात्री करूनच प्रशिक्षण संस्था व प्रशिक्षण कार्यक्रमांची  निवड करण्यात आली आहे.

सदर  प्रकल्पात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना प्रत्येकी एक व्हाऊचर सेंटर फ़ॉर सिव्हिल सोसायटी मार्फत अदा करणायात येते .  उमेदवारास ज्या प्रशिक्षणात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या प्रशिक्षण संस्थेत  व्हाऊचर जमा करून, एकूण प्रशिक्षण शुल्काच्या १० % प्रशिक्षण शुल्क संबंधित प्रशिक्षण संस्थेत अदा करावयाचे असते. सदर उमेदवारांचे उर्वरित ९० % प्रशिक्षण शुल्क बार्टी, पुणे मार्फत अदा करण्यात येते..

या प्रकल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये सहभागी होणाऱ्या  युवक-युवतींना प्रशिक्षण कार्यक्रमाची निवड करण्यापूर्वी करियर मेळाव्यामध्ये सहभागी होता येईल. या करियर मेळाव्यांमध्ये त्यांना त्यांची आवड आणि कल लक्षात घेऊन करियरच्या विविध संधीविषयक मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात येईल. पुण्यामध्ये विविध ठिकाणी दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ पासून ऑक्टोबर अखेर पर्यंत अशा प्रकारचे एकूण १६ करियर मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. करियर मेळाव्यामध्ये सहभागी होणाऱ्या व प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जातीच्या युवक-युवतींना "स्किल व्हाऊचर्स" दिली जातील.

या प्रकल्पामध्ये प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या १००% प्रशिक्षणार्थींना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याची महत्वाची जवाबदारी सहभागी प्रशिक्षण संस्थांना देण्यात आली आहे. "विकल्प" प्रकल्पामध्ये प्रशिक्षण संस्थांना टप्प्या-टप्प्याने देण्यात येणारी निधीची रक्कम प्रत्येक टप्प्यावरील प्रशिक्षण संस्थेची कामगिरी व १००%

प्रशिक्षणार्थींना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे या बाबींशी जोडलेली आहे. त्यामुळे प्रशिक्षण संस्थांनी प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता राखावी व अधिकाधिक जवाबदारीने प्रशिक्षण राबवावे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट्य आहे.

हा प्रकल्प राबविण्याकरिता बार्टी, पुणे यांनी सेंटर फ़ॉर सिव्हिल सोसायटी या दिल्ली स्थित नामांकित व अनुभवी संस्थेची नेमणूक केली आहे. हा प्रकल्प गेल्या दोन वर्षांपासून मुंबई आणि पुणे येथे राबविण्यात येत असून आतापर्यंत १४०० हून अधिक अनुसूचित जातीच्या युवक-युवतींनी त्याचा लाभ घेतला आहे.

पुण्यातील अनुसूचित जातीच्या अधिकाधिक युवक-युवतींनी दि. २५ सप्टेंबर, २०१५ पासून सुरु होणाऱ्या करियर मेळाव्यांमध्ये सहभागी व्हावे आणि या उत्कृष्ट संधीचा लाभ घ्यावा असे बार्टी, पुणे यांचेतर्फ़े आवाहन करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी ९०९६९००९००/९८९०१७७६३० या नं. वर स.१०.०० ते साय ६.०० या वेळेत संपर्क साधावा.